संदर्भ ग्रन्थ की सूचि

१.चौधरी नवीन —जनता स्टोर,राधा किशन प्रकाशन

२.गुप्ता एवं जोहरी —पोलिटिकल प्रोसेस इन इंडिया,विशाल पब्लिशिंग कंपनी

३.हजारे सुभाष चंद्र — स्टूडेंट पॉलिटिक्स इन इंडिया,साऊथ एशिया बुक्स

४.जैन पुखराज,फड़िया बी एल—भारतीय शासन एवं राजनीति

५.मोहंती डी के — हायर एजुकेशन एंड स्टूडेंट पॉलिटिक्स इन इंडिया,अनमोल पब्लिशर (१९९७)

६.मिश्रा आशुतोष —राजनैत,नवधारा पब्लिकेशन फर्स्ट एडिशन (२०१६)

७.पटनायक एस के — स्टूडेंट पॉलिटिक्स एंड वोटिंग बिहेवियर,कांसेप्ट पब्लिशिंग कंपनी

८.रॉय हिमांशु एवं सिंह महेंद्र प्रसाद — इंडियन पोलिटिकल सिस्टम,पियर्सन इंडिया

९.सिंह हरविंदर — डेमोक्रेटिक ओरिएंटेशन ऑफ स्टूडेंट इन इंडिया,कांसेप्ट पब्लिशिंग कंपनी

१०.स्टीवेंसन कोहिर — मीडिया लिट्रेसी प्रोजेक्ट फॉर प्री यूनिवर्सिटी स्टूडेंट,कांसेप्ट पब्लिशिंग कंपनी

वेब लिंक

1-https%//www-jagran-com/news/national& jnu&violence&the&history&of&student&politics&in&india

2-https%//www-pravakta-com/the&student&union&to&strengthen&democracy/

3-https%//en-wikipedia-org/wiki/Students%27_union

□□□

52

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यातील योगदान

प्रा. डॉ. भारती यादव
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे

**********

**प्रस्तावना—**

भारताच्या महान संस्कृतीचा उद्घोष नेहमीच केला जातो पण त्याचबरोबर भारताला धर्मशास्त्रातील जात, वर्ग, लिंग व विषमतेचा कलंक आहे. त्यामुळेच भारतीय स्त्री व शूद्र वर्गाला हजारो वर्षे शिक्षणाची कवाडे बंद होती. अशा धर्मशास्त्राच्या अभेद्य भिंती तोडून ज्ञानाचा प्रकाश भारतीय स्त्री व शूद्र वर्गाच्या अंगणात पाडण्याचे महान कार्य ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने केले. एकोणिसाव्या शतकातील प्रमुख शिक्षण तज्ञ सावित्रीबाई फुले यांची ओळख महात्मा ज्योतिबा फुले यांची पत्नी किंवा सहकारी म्हणून झालेली आहे,ती अपुरी आहे. त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यातील योगदान अधोरेखित करण्यात आलेले नाही. ज्या स्त्रियांची अज्ञान व गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी सावित्रीबाई हयातभर झगडल्या त्या स्त्रियांना सुद्धा त्यांची व त्यांच्या कार्याची ओळख पुरेशी झालेली दिसत नाही.सावित्रीबाई फुले या भारतातील थोर क्रांतिकारक स्त्री होत्या. ज्योतीरावांच्या कार्यात त्यांचा सहेतुक व डोळस सहभाग होता. त्या एक प्रतिभावंत शिक्षणतज्ञ होत्या. त्यांच्या अंगी कुशल नेतृत्वाचे अनेक गुण होते. त्या उत्तम संघटक होत्या. प्रभावी वक्त्या होत्या. प्रतिभासंपन्न कवीत्री होत्या. सुरुवातीला ज्योतिरावांची पत्नी, विद्यार्थिनी, कवित्री, शिक्षिका, मुख्याध्यापिका, समाजसेविका, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत असा त्यांचा झालेला प्रवास आणि विकास मनोज्ञ आहे. पहिल्या भारतीय महिला शिक्षिका झाल्या तेव्हा



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17